## कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय

### (पशुपालन ,दुग्ध व मत्स्यपालन विभाग)

### अधिसूचना

नवी दिल्ली , 28 एप्रिल, 2017

### राष्ट्रीय सागरी मत्स्य धोरण , 2017

**एफ .नं.21001/ 05/2014 (भारत) खंड (v) – प्रस्तावना**

1.0 राष्ट्रीय सागरी मत्स्यधोरण 2017 चे मुख्य ध्येय , राष्ट्राच्या वर्तमान आणि भावी पिढीच्या हितासाठी भारताच्या विशेष आर्थिक क्षेत्रात (ई.ई.झेड) मध्ये उपलब्ध सागरी जैविक संसाधनांचा आरोग्य आणि परिसंस्थीय एकात्मिकतेबरोबर शाश्वत मासेमारीची निश्चिती करणे आहे. एन.पी.एम.एफ 2017 ची समग्र कार्यप्रणाली सात स्तंभांवर अर्थात शाश्वत विकास, मच्छिमारांचे सामाजिक- आर्थिक जीवनमान उंचावणे, साहचर्य तत्व , भागीदारी, आंतपिढीय न्यायशीलता, लैंगिक न्याय आणि प्रतिबंधात्मक दृष्टिकोन यांवर आधारित आहे. हे सात स्तंभ देशाच्या सागरी मत्स्यव्यवसाय विभागाच्या विकासासाठी तयार केली गेलेली ध्येय आणि उदिदष्ट्यांची पूर्ती करण्याकरिता विविध भागधारकांना कार्यप्रवण करण्यासाठी मार्गदर्शन करेल. मच्छिमार हा या धोरणाचा गाभा असेल आणि याची कार्यवाही ही 'सार्वजनिक विश्वास सिध्दांता' ने निर्देशित होईल.

DRAFT

**नमूद करणे -** भारताला 8118 कि. मी. लांबीची विस्तीर्ण किनारपट्टी लाभलेली असून , 2.02 दशलक्ष चौरस किमीचे विस्तीर्ण विशेष आर्थिक क्षेत्र लाभले आहे. त्यात  वैविध्य आणि सागरी संसाधनाने समृध्द असे दोन व्दिप समूह येतात.

**दखल घेणे** सागरी मत्स्य संपदेचे वार्षिक उत्पादन क्षमता अंदाजे 4.412 दशलक्ष टन आहे.

**विचार केला असता** 4.0 दशलक्ष लोक उपजिविकेसाठी सागरी मत्स्य संसाधनावर अबलंबून आहेत.

**श्रेय निर्देश** सागरी मत्स्य क्षेत्र 65000 करोड किंमतीचे आर्थिक संपत्तीचे योगदान करीत आहेत.

**दखल घेणे** याहीपेक्षा सागरी मासेमारी, अन्न, पोषण मूल्य, रोजगार आणि उत्पन्नवाढीचा महत्वाचा स्त्रोत असल्याची जाणीव आहे.

**जाणीव असणे** सागरी मत्स्यसंपतीचे देशाच्या निर्यात मिळकतीत आणि व्यापार संतुलन राखण्यात महत्वाचे योगदान आहे.

**निरिक्षण करणे**  देशातील सागरी मासेमारीत वैविध्य असून त्यात प्रामुख्याने लघु आणि पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणा-यांचा समावेश आहे.

**पुढील निरिक्षण** पुढे असेही निदर्शनास आले आहे की , सागरी मत्स्य क्षेत्र विविध प्रकारच्या शासकीय आणि अशासकीय एजन्सी आणि इतर भागधारकाव्दारा कार्यरत आहे.

**स्वीकारणे** हेही स्वीकारले आहे की,  सागरी मत्स्य संसाधन देशाला मत्स्यपालनासारख्या शाश्वत पध्दतीतून उत्पादन वाढीसाठीची क्षमता बहाल करीत आहे.

DRAFT

**समजून घेणे** हेही समजून घ्यायला हवे की,  सागरी मत्स्य संसाधन मर्यादित असल्याने ती संपण्याची भीती आहे. त्यामुळे त्याचा अतिरीक्त उपसा-अतिमासेमारी टाळायला हवी.

**पुढील जाणीव** याची ही जाणीव आहे की, अशाप्रकारे अधिक उपसा केल्यास जैवविविधतेचा -ह्रास आणि भावी पिढीसाठी संसाधनाची उपलब्धतेत कमतरता होईल.

**संबंध** याची ही खूणगाठ बांधायला हवी की, देश आंतरराष्ट्रीय करारानुसार सागरी संसाधनाच्या शाश्वत वापरासाठी कटिबध्द आहे.

राष्ट्रीय सागरी मत्स्यधोरण एन पी एम एफ 2017 देशाची सागरी मत्स्यक्षेत्र – खालील ध्येय, उद्दीष्टे आणि कार्यप्रणालीवर आधारीत आहे.

### दृष्टी

एक निरोगी आणि समृध्द सागरी मत्स्यक्षेत्र जे वर्तमान आणि भावी पीढीच्या गरजा पुरवेल

### ध्येय

संसाधनांची शाश्वतता केंद्रस्थानी मानून योजनाची रूपरेखा राष्ट्रीय , सामाजिक आणि आर्थिक उदिष्टे तसेच मच्छीमार समुदायाच्या जीवनमानात शाश्वतता आणि त्यांचा आर्थिक- सामाजिक स्तर उंचाविण्यासाठी आणि पुढील दहा वर्षांच्या दरम्यान देशाच्या सागरी मत्स्य क्षेत्राला समन्वय आणि व्यवस्थापनासाठी मार्गदर्शन करण्याचे प्रयोजन आहे.

DRAFT

## कार्यप्रणाली

### भारतातील सागरी मत्स्य क्षेत्र – एक रूपरेखा

2.0 भारतीय विकासात्मक योजनेमध्ये फार पूर्वीपासून मत्स्यक्षेत्र तसेच प्रामुख्याने सागरी मत्स्य क्षेत्राच्या क्षमतेला प्रमुख स्थान दिले गेले आहे आणि तेव्हापासूनच या क्षेत्राला  विकासाचे एक महत्वपूर्ण साधनाच्या स्वरूपात विकसित करण्यासाठी सार्वजनिक आणि खाजगी स्तरावरही व्यापक प्रयास करून कार्यान्वित करण्यात आले. राष्ट्राच्या लोकसंख्येच्या अन्न, पोषण गरजांची पूर्ती करण्याव्यतिरिक्त मत्स्यक्षेत्र व्यापार आणि व्यावसायिक क्षेत्रात  महत्वाची भूमिका बजावत आहे आणि या प्रक्रियेच्या माध्यमातून सागरतटीय समुदयासाठी रोजगार आणि उपजिविका मिळण्यास प्रोत्साहन मिळत आहे.

3.0 पूर्णत: पारंपारिक स्वरुपात सुरवात होउन मत्स्यक्षेत्र आज व्यावसायिक उद्योगात परावर्तीत झाले आहे. 1976 मध्ये विशेष आर्थिक क्षेत्र {ई ई झेड} घोषित झाल्यावर भारतात अंदाजे 2.02 दशलक्ष चौरस मि.मीटर क्षेत्र उपलब्ध झाल्याचा अंदाज वर्तविला आहे. विशेष आर्थिक क्षेत्रातील सार्वभौमत्वाबरोबरच भारताने या क्षेत्रातील सागरी जलसंसाधनांचा संवर्धन विकास आणि इतर उत्पादन घेण्याचे उत्तरदावित्व ही स्वीकारले आहे. 2011 मध्ये भारत शासनाव्दारा गठण केलेल्या तज्ञ कार्यकारी गटाने { **Expert Working Group}**  भारतीय ई ई झेड ची संभाव्य उत्पादन क्षमता 4.412 दशलक्ष चौरस टन होण्याचा अंदाज वर्तविला आहे. हा अंदाज 2000 सालामध्ये कार्यकारी गटाने केलेल्या पूर्व अंदाज (3.934 एम एम टी) पेक्षा 12.2 अधिक आहे. पेलजिक संसाधनासारख्या जसे ऑईल सार्डिन, रिबन फिश, भारतीय मैकरेल, इत्यादी 2.128 एम एम टी डिमर्सल संसाधन जसे पेनाइड आणि नॉन पेनाइड प्रान,  सीफैलोपोड, पर्चेस, क्रोकर्स, इत्यादि 2.067 एम एम टी (46.8%) आहे. तसेच महासागरी संसाधन जसे येलोफिन टूना, स्पिकजैक टूना,

DRAFT

बिगाआई टूना, बिलफिश, पेलाजिक शार्क, बाराकुडा, डॉलफिन मासा तसेच बाहू 0.27 एम एम टी (4.9%) आहे. भारतीय ई ई झेड मध्ये अंदाजे उत्पादन क्षमतेचे खोलीवार  वितरण अशाप्रकारे आहे. 100 मीटर खोलीपर्यंत 3.821 एम एम टी (86.6) टक्के 100-200 मीटर पर्यतच्या खोलीपर्यंत 0.259 एम एम टी (5.8 टक्के) तसेच 200-500 मीटरच्या खोलीपर्यंत 0.115 एम एम टी (2.6 टक्के) उर्वरित 0.217 एम एम टी (4.9 टक्के) महासमुद्रीय जलाधी क्षेत्रात व्यापलेले आहे. मागील चार वर्षाच्या दरम्यान ( 2012-13 पासून 2015-16 ) पर्यंत सरासरी सागरी मत्स्य उत्पादन 3.499 एम एम टी रहिले आहे. 2015-16 च्या दरम्यान हे उत्पादन 3.583 एम एम टी इतके होते. तथापि सागरी तटावरील निकटवर्ती सागरी संसाधनांचा पूर्णत: वापर केला जातो त्याप्रमाणेचखोल सागरी आणि महासागरीय जलाधी क्षेत्रात उत्पादन वाढीची संधी उपलब्ध आहे.

4.0 2010 च्या राष्ट्रीय सागरी मत्स्य जनगणनेनुसार भारतात सागरी मासेमारी करणा-या मच्छिमारांची संख्या 4.0 दशलक्ष आहे. त्यात 0.99 दशलक्ष क्रियशील मच्छिमार आहेत. क्रियशील मच्छिमारांमध्ये 33 टक्के यांत्रिकी क्षेत्रात, 62 टक्के मोटराईज्ड क्षेत्रात तसेच 5 टक्के पारंपारिक / आर्टीझनल क्षेत्रात कार्य करीत आहेत. एकंदरित सागरी मत्स्य उत्पादनात 75 टक्के यांत्रिक क्षेत्रातून, 23 टक्के मोटरराईज्ड क्षेत्रातून तसेच 2 टक्के पारंपारिक क्षेत्रातील आहेत. मागील 50 वर्षांच्या दरम्यान भारतामध्ये सागरी मत्स्य उत्पादनाचा आलेख स्पष्टपणे असे दर्शवित आहे की,  साठाव्या दशकापर्यंत एकंदरीत उत्पादनात पारंपारिक क्षेत्राचे योगदान महत्वपूर्ण होते. अनुक्रमाने दरम्यानच्या काळात यांत्रिकी मासेमारीची लोकप्रियता आणि सातत्याने विस्तारीत झालेली यांत्रिकी मासेमारीमुळे, तसेच पारंपारिक नौकामध्ये झालेल्या यांत्रिकीकरणामुळे पारंपारिक क्षेत्रातील योगदान काही वर्षांपासून सतत कमी होत आहे आणि यांत्रिकी ट्रालिंग मासेमारी पध्दत आता

DRAFT

भारताच्या विविध मत्स्य पध्दतींच्यामध्ये सर्वाधिक महत्वपूर्ण झाली असून एकंदरीत सागरी मत्स्य उत्पादनात तिचे 55% योगदान आहे.

5.0 महसूलाच्या स्वरूपात खोल जलाधी क्षेत्रात मिळणारी काही उच्च मूल्य असलेल्या प्रजाती, जसे टूनाचेही इष्टतम प्रमाणात उत्पादन घेतले जाते, उपलब्ध सागरी संसाधनाच्या पूर्ण क्षमतेने उत्पादन घेतल्यास देश तसेच या क्षेत्रातील संबंधित  लोकांचा शाश्वत पातळीवर विकास होवू शकेल. या क्षेत्रातील गतीशीलता पाहता , सद्यस्थितीत तांत्रिक ज्ञान तसेच संसाधनाचा लाभ घेण्यासाठी विविध योजना आणि कार्यक्रमांना सुलभ कार्यान्वित करण्याची गरज आहे. या दृष्टीने एन पी एम एफ (2017) खालील शिफारशी करीत आहे.

### मत्स्य व्यवस्थापन

6.0 शासनाव्दारा भारतीय ई ई झेड मध्ये माशांच्या संभाव्य उत्पादन क्षमतेच्या आकलनासाठी 2011 मध्ये गठण करण्यात आलेल्या कार्यकारी तज्ञ अभ्यास गटाने सर्व सागरीराज्य/ संघशासित प्रदेशांमध्ये विविध प्रकारच्या यांत्रिकी मत्स्यनौकाच्या संदर्भात जलाधी क्षेत्रात अधिक क्षमता असण्याची शक्यता वर्तविली होती तसेच शासनातर्फे कमाल विहिताच्या आकारसंदर्भात सूचना दिल्या होत्या. त्यात मच्छीमार गटांव्दारे अहवालात नमूद केलेल्या सूचनांवर विचार करण्यात येईल, तसेच अशा वाढीव मासेमारी क्षमतेला आळा घालण्याकरिता कार्यप्रणाली विकसित केली जाईल आणि राज्य / संघशासित प्रदेश आणि अन्य संबधित भागधारकांच्या विचारविनिमयातून ती लागू करण्यात येईल.

7.0  भारताच्या निकटवर्ती सागरीक्षेत्रातून सागरी क्षेत्रातून सद्यस्थितीत सरासरी उत्पादन दर हा संभाव्य कमाल उत्पादन क्षमतेच्या जवळपास आहे आणि 200

DRAFT

मीटर खोलीच्या कमाल उत्पादन क्षमतेने दर्शविला आहे. दुसरीकडे महासमुद्रीय जलातही अजूनही उच्च मूल्य असलेली संसाधन जसे टूना, टूना सारख्या प्रजाती, मिक्टोफिड्स तसेच महासमुद्रीय स्किवड सारखी एक प्रजाती उपलब्ध आहे. तथापि सद्यस्थितीतील उत्पादन आणि संभाव्य उत्पादन क्षमतेच्या अंदाजामधील व्यापक अंतर पाहता वन मत्स्य उत्पादनाच्या संदर्भात वैश्विक मानांकनाला अनुसरून सावध दृष्टीकोन अवलंबिण्याची आवश्यकता आहे. गोड्या पाण्यातील जलाच्या संदर्भात शासकीय धोरणात प्रत्येक मत्स्यसाठयापासून कमाल शाश्वत उत्पादन घेण्यावर भर देईल.

८.0 सागरी मत्स्य क्षेत्राची पूर्ण क्षमता लक्षात घेतल्यावर मत्स्य प्रयास व्यवस्थापन साधारण नौकांच्या आकारांना कमाल क्षमतेचे बनविण्यासाठी उत्पादन प्रक्रियेत जैवविविधता संवर्धनाला मुख्य प्रवाहात आणणे, प्रजाती विशेष तसेच क्षेत्रविशेष व्यवसापकीय योजनांसाठी प्रयास केले जातील, त्यात परिसंस्थितीय तसेच जीवशास्त्रीय विशेष क्षेत्रात (**Ecologically and Biologically Significant Areas)** तसेच संवेदनशील सागरी परिसंस्थिय क्षेत्रांचे संरक्षण, आइकोनिक तसेच आपत्तीग्रस्त प्रजातीची सुरक्षा, संसाधनांच्या शाश्वत वापरासाठी स्थानीय (**Spatial)** तसेच सामायिक (**temporal)** उपाय, तसेच विचारविनिमय प्रक्रियेव्दारा मत्स्य रिफ्यूजियाची निर्मिती सुध्दा समाविष्ट आहे. त्याचबरोबर  शासन सदयस्थितीत सागरी संरक्षण क्षेत्रात पारंपारिक मच्छिमारांचे अधिकार सुरक्षित आहेत किंवा नाहीत, तसेच या संवर्धनाच्या उपायामुळे त्यांचा उपजिविकेवर प्रभाव तर पडत नाही ना,  याचा आढावा आणि मूल्यांकन करेल.

9.0 मत्स्य व्यवस्थापनासंदर्भात एकात्मिक दृष्टीकोन अवंलबिता जाईल. ज्यात पारंपारिक ज्ञान आणि विज्ञानासोबत व्यावसायिक तत्व आणि प्राथमिक भागधारक आणि संलग्न उपक्रमात अंतर्भाव असणा-या लोकांना प्रभावीपणे सामील करून

DRAFT

घेतले जाईल, जेणेकरून परिसंस्थीय आणि आर्थिक मासेमारी ही शाश्वत आहे , याची निश्चिती देता येईल. पारंपरिक तसेच यांत्रिक क्षेत्रातील वाद मिटवण्यासाठी सामूहिक चिंतेच्या या नव्याने उपस्थित झालेल्या समस्येच्या निवारणासाठी, तसेच सुसंगत व्यवस्थापकीय दृष्टीकोन आणि अधिक चांगल्या स्वरूपात सहकार्य करण्यास प्रोत्साहीत करण्याकरिता राष्ट्रीय क्षमता बांधणीसाठी मत्स्यव्यव्सायाबाबत असणा-या शासकीय कायदयांमध्ये सुधारणा केली जाईल.

10.0 सदयस्थितीत संसाधनांची उपलब्धता दर्शविणारे नकाशे, उत्पादकतेचे निर्धारण, सदयस्थितीतील संभाव्य मत्स्य पालन क्षेत्रा **(PFZ)** बाबत सल्ला देणे आणि मच्छिमारांच्या हितासाठी हवामानाची पूर्वसूचना देणे . इत्यादी संदर्भात त्वरित आणि सोप्या पध्दतीने प्रसार करण्यासाठी ज्ञान व्यवस्थापन एक माध्यम बनेल. मच्छिमार समुदायाच्या समर्थनार्थ त्यांना होणा-या लाभाचा अधिकतम उपयोग करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान **(IT)** आणि अंतराळ तंत्रज्ञानाला **(ST)** वापर करण्यात येईल.

11.0 स्थानिक आणि सामायिक बंधनांनी देशाच्या सागरी मत्स्य संपतीला शाश्वत राखण्यास मदत केली आहे. ह्याची निश्चिती करण्यासाठी ह्या प्रकारच्या व्यवस्थापकीय उपायांचा प्रभावीपणे अवलंब केल्याने मच्छिमारांच्या जीवनमानात सुधारणा होईल. प्रतिबंधात्मक दृष्टीकोनासहित सर्वोतम उपलब्ध वैज्ञानिक सूचनांना ध्यानात ठेवून तसेच मच्छिमार आणि इतर संबधित भागधारकांना सामील करून त्याचे कालांतराने पुनर्वालोकन केले जाईल.

12.0 सागरी मत्स्य संसाधन अमर्याद नाहीत, जसे कि अनेक बाबतीत पाहिले गेले आहे की, अनियंत्रित हार्वेस्ट ( अनियंत्रितेत मासेमारीमुळे) उपलब्ध संसाधन संपू शकतात. मत्स्य प्रयत्नांना कमाल उंचीपर्यंत नेण्याकरिता तसेच संसाधनांना शाश्वत

DRAFT

बनविण्यासाठी , पूरक उपाय अवलंबिण्यासाठी शास्त्रीय संस्था तसेच मच्छिमारांसोबत विचारविनिमय करून शासन उचित पावले उचलेल. या उपायांसोबतच इन्पुट तसेच आऊटपुट नियंत्रण , नौकांचा आकार, मासेमारीचा काळ किंवा दिवस , मासेमारी करण्याचे क्षेत्र , इंजिनची हॉर्सपॉवर , गिअरचा आकार, कमाल शाश्वत उत्पादन **(MSY)** जाळीचा किमान आकार , तसेच त्यामानाने कमी उत्पादन देणा-या मत्स्य क्षेत्रांना परावर्तित करणे. तसेच नौका योजना आणि संसाधन नष्ट होणं रोखण्याची निश्चिती करण्याकरिता मत्स्य व्यवस्थापन क्षेत्राची निर्मिती करणं आणि त्याचबरोबत इतर संबधित संस्था कमी किंवा –ऱ्हास पावत चाललेल्या मासळी उत्पादनाच्या पुनर्निर्मिती आणि पुन: संवर्धनासाठी योजनांची निर्मिती करण्याचे निश्चित करेल. मत्स्य व्यवस्थापनासाठी एक क्षमता मूल्यमापन रूपरेषा ही **(Capacity appraisal framework)** विकसित केली जाईल.

13.0 सदयस्थितीत सागरतटीय आणि संघराज्यक्षेत्रात सागरतटीय खोली आणि अंतराच्या आधारावर पारंपरिक मच्छिमारांसाठी विशेष आरक्षित क्षेत्र नमूद केले आहे. ज्यामध्ये यांत्रिक पध्दतीने मासेमारी करण्यास परवानगी असत नाही**,** अशा क्षेत्राच्या वापराचे अधिकार मिळाल्यास **(Territoral Use Rights for Fisheries or TURFs)** पारंपारिक मच्छिमारांच्या उपजिविका शाश्वत राखण्यास मदत होत असल्याचे सिध्द झाले आहे. शासन पारंपारिक मच्छिमारांना अशाप्रकारे सहाय्य करीत राहिल आणि कार्यकारी समूहासोबत विचारविनिमय करून प्रादेशिक जलात पारंपारिक मच्छिमारांना सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या क्षेत्रात वाढ करण्यासाठी विचार करेल.

14.0 परिसंस्थीय तंत्राच्या सर्व जैविक आणि निर्जीव घटकांवर योग्य विचार करून आणि भागधारकांच्या हितासाठी परिसंस्थीय दृष्टीकोनातून मासेमारी व्यवस्थानाचा **(EAFM)** अवलंब करण्यात येईल. अशाप्रकारे मत्स्यक्षेत्रात वैश्विक पातळीवर बहु-

DRAFT

भागधारक, बहु-प्रजाती तसेच बहु-नौका मासेमारीचा अंतर्भाव असणारी मत्स्यक्षेत्रातील ही एक यशस्वी व्यवस्थापन पध्दती आहे. यात सहभागी व्यवस्थापन किंवा सह-व्यवस्थापन (**participatory management or co-management)** ला पुष्टी देण्यात येईल. आंतरराज्य आणि राष्ट्रीय मत्स्य परिषदेला सामिल करणारी अशी सह-व्यवस्थापकीय प्रणाली मच्छिमारांमधील विभिन्न समुहातील तंटे, वादविवादांचे निवारण करील . मत्स्य संशोधन संस्था, सागरतटीय राज्य, संघराज्य क्षेत्र, मच्छिमार तसेच इतर संघटना, मत्स्य क्षेत्रातील इतर संबधित भागधारकांच्या सोबत विचारविनिमय चर्चा करून या व्यवस्थापनांच्या नियमांची आखणी तयार केली जाईल.

15.0 भारतीय विशेष आर्थिक क्षेत्राच्या 12-200 सागरी मैलामध्ये मत्स्य संचलन,पशुपालन, दुग्ध आणि मत्स्यपालन विभाग ( डी ए एडी एफ ) च्यावतीने वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार होते. या मार्गदर्शकतत्वाच्या आधारित पात्र परवाना धारकांना निर्देशित केलेल्या क्षेत्रामध्ये मासेमारी करण्याची परवानगी पत्र ( **Lop** या **Letter of Permit)** दिले जात होते. असे पाहण्यात आले की, एल ओ पी योजनेचे खोलसमुद्रात मासेमारी करण्याच्या क्षेत्राच्या समावेशक विकासावर फारसा प्रभाव पडला नाही, त्यामुळे शासन एल ओ पी योजनेला परत घेऊन या क्षेत्राच्या विकासासाठी एक पर्यायी यंत्रणेचा विचार करील. सागरी मासेमारीचे लघु प्रमाणात मासेमारी करण्याचे वैशिष्टे पाहता, सागरी मासेमारीच्या समावेशक विकास आणि उपलब्ध संसाधनाच्या कमाल उत्पादनासाठी खोलवर समुद्रात मासेमारी आणि प्रक्रिया उद्योगात खाजगी गुंतवणुकीला प्राधान्य दिले जाईल. मत्स्यक्षेत्र, विदेशी तंत्रज्ञान आदान-प्रदान कार्यक्रमाव्यतिरीक्त खोल समुद्रातील मत्स्य संसाधनांच्या शाश्वत वापरासाठी या क्षेत्राच्या विभागासाठी समुद्रात दूरवर प्रवास करू शकतील, अशा आधुनिक खोलसमुद्रातील मत्स्यनौकांना

DRAFT

विदेशी तंत्रज्ञाचा आधार दिला जाईल. खोल समुद्रातील मासेमारीसाठी भारतीय मासेमारी नौकाच्या क्षमता निर्मितीसाठी सर्व केंद्रीय राज्य शासनातील उद्योजकांना सोबत घेवून **(single window approach)** एकल खिडकी दृष्टीकोन अवलंबिला जाईल. औदयोगिक विकास खाजगी गुंतवणूक सार्वजनिक खाजगी भागीदारी (पी पी पी) आणि सागरी मासेमारीसाठी संस्थार्गत वित्तच्या अधिक लाभासाठी प्रोत्साहीत केले जाईल. याव्यतीरिक्त सागरी मत्स्य क्षेत्राच्या सर्व (सर्वांगीण) समावेशक विकासासाठी सी-फूड प्रक्रिया तसेच निर्यात उदयोगाला खोल समुद्रात मत्स्य उदयोगासोबत जोडण्याची रूपरेषा आखली जाईल.

16.0 खोल समुद्रातील मासेमारी लोकप्रिय करण्यासाठी आणि पारंपारिक मच्छिमारांचे कौश्यल्य आणि क्षमता वृध्दीसाठी शासन विकासात्मक नविन योजना आणणार आहे. या योजनेव्यतिरीक्त खोलसमुद्रात मासेमारी करणा-या अस्तित्वात असलेल्या पारंपारिक (जहाजांचे) नामांचे आधुनिकरण, मच्छिमारांच्या सहकारी / स्वयं सहाय्यक गटाच्या माध्यमातून खोल समुद्रात मासेमारी करण्याचा नवीन पारंपारिक नौकाचे (जहाजांचे) आदान ऑन-बोर्ड प्रशिक्षण, बाजारपेठ आणि निर्याच्या जोडीबाबत विचार केला जाईल. या प्रक्रिया/ योजनांना लागू करते वेळी याची निश्चिती केली जाईल. प्रथम विशेष आर्थिक क्षेत्रात मासेमारी संदर्भात आंतराष्ट्रीय नियमांचे पालन केलेले असेल. विशेष आर्थिक क्षेत्रात खोलसमुद्रातील संसाधनाचा उपयोग केवळ विशेष आर्थिक क्षेत्रात उपलब्ध संसाधनाच्या संदर्भात नसून पायाभूत सुविधा, नौका निर्मिती, सर्वेक्षण आणि प्रमाणीकरण, मानवी क्षमताबांधणी आणि वस्तुनिष्ठ व्यापक स्वरूपात नियमांना मर्यादित करण्यासाठी तांत्रिक साधनांवर पुनर्विचार करीत, तथापि एक प्रभावी नियंत्रण आणि देखरेख यंत्रणा (एम सी एस), व्यावसायिक मत्स्य संसाधनांच्यावर वैज्ञानिक आणि तांत्रिक माहितीची उपलब्धता,

DRAFT

आणि त्याला लक्ष्य करण्याकरिता मासेमारी करण्याच्या पध्दतीवर लक्ष दिले जाईल.

17.0 सागरतटीय राज्याची निकड पाहता विशेष आर्थिक क्षेत्रासाठी एक सर्वसमावेशक संसाधनाच्या वापराची योजना तयार केली जाईल. त्यावेळी तटीयराज्य संघशासित प्रदेशांना सुध्दा हे समजून घेण्यासाठी आग्रह धरला जाईल की, 12 ते 200 सागरी मैलाच्या अंतरादरम्यान विशेष आर्थिक क्षेत्रात केंद्रशासनाव्दारा व्यवस्थापित एक उभय-निष्ठ (कॉमन) संसाधन असणारे क्षेत्र आहे. तसेच इथे राज्यसंघ शासित प्रवेशव्दारा एकल मत्स्य प्रणालीमुळे अति मासेमारी आणि आंतरराज्यीय संघर्ष होवू शकतात, म्हणूनच संघ आणि राज्य शासनांनी ई ई झेड मध्ये संसाधनाचा शाश्वततेसाठी प्रतिबंधात्मक प्रणाली तसेच उपायाबाबत सहमती होण्याकरिता एकत्रितपणे काम करावे लागेल. सागरी मासेमारीच्या व्यवस्थापनासाठी आंतरराज्यीय तसेच आंतराष्ट्रीय वादविवाद , तंटे कमी करण्यासाठी आणि त्याचे व्यवस्थापन करण्याकरिता एक संस्थागत यंत्रणा विकसित आणि सुदृढ केली जाईल. शासन एकत्मिक तसेच व्दिपीय मत्स्यविकास योजना तयार करणे तसेच त्याचा अवलंब करणार आहे. जे तटवर्ती राज्य आणि व्दिपांच्या अर्थव्यवस्थेच्या वृध्दीस सहय्यक ठरेल. या योजनांमध्ये अतिमासेमारी रोखण्याकरिता शाश्वत मासेमारीची रूपरेषा, सागरतटीय /व्दिपीय पर्यटन , नौकाचे परिभ्रमण करतांना पुन्हा तेल भरण्यासाठी बार्जेसची उपलब्धता , मूलभूत वाहक बोटी आणि समुद्रात भ्रमण करतांना फिरत्या रूग्णवाहिन्या आदिंचा समावेश असेल.

18.0 राष्ट्रीय न्यायाधिकरण क्षेत्रापासून वेगळ्या क्षेत्रात (ए बी एनजे) मत्स्य संसाधन जसे की क्रिल-फिशिंग इत्यादिंच्या उत्पादनासाठी केल्या जाणा-या व्यापक संधी उपलब्ध आहेत. ज्या अनेक देशांव्दारे उत्पादित केल्या गेल्या आहेत. शासन खुल्या समुद्रातील मासेमारी संबधित आंतरराष्ट्रीय करार क्षेत्रात नियमांच्या पालन

DRAFT

करण्याच्या अटीवर तसेच तटीय सुरक्षा आणि समुद्रात मच्छिमारांची सुरक्षा ध्यानात ठेवून उचित नियंत्रण आणि संदेशवहन् यंत्रणेसहित भारतीय मासेमारी नौकांव्दारा ए.बी.एन,जे मध्ये संसाधनाच्या वापरासाठी प्रोत्साहन देईल.

## देखरेख, नियंत्रण आणि पाळत ठेवणे (एम.सी,एस)

19.0 सागरी मत्स्यक्षेत्रात क्षेत्रात सदयस्थितीत अस्तिवात असलेल्या सुलभ आणि प्रभावी एम.सी.एस प्रणालीला अधिक मजबूत करण्याची आवश्यकता आहे. शासनाने सागरी क्षेत्रात चालणा-या सर्व मत्स्य वाहनांचे (पारंपरिक, मोटराइज्ड, यांत्रिकी तथा बिगरयांत्रिकी) नोंदणीकरण करण्यासाठी एम ऑनलाइन एमसमान नोदंणीकरण आणि परवाना यंत्रणा (रियलक्राफ्ट) सुरू केली आहे. तथापि नोंदणीकरण आणि परवानाच्या माध्यमातून मासळी पकडण्याचे नियंत्रण आणि मासेमारी संबधी प्रयासाचे नियंत्रण होत आहे. तरी सुद्धा एम.सी.एस हालचालीवर सागरी राज्य /संघराज्य क्षेत्रातील मत्स्य विभाग, तटवर्ती सागरी पोलिस तसेच तटरक्षकासारख्या संबधित ऐजंसिज अधिक भागीदाराच्या माध्यमातून अधिक बळकट केले जाईल. समुद्री राज्य / केंद्रशासित प्रदेश, तटीय सागरी पोलिस आणि भारतीय तटरक्षक (आयसीजी) च्या, मत्स्यव्यवसाय विभाग (डीओएफ) च्या मोठ्या सहभागाद्वारे या कार्यवाहीला आणखी मजबूत केले जाईल. एम .सी.एस मध्ये टप्याटप्याने सशक्तीकरण आणि सुधारणा करण्यात येईल. त्यासाठी पारंपारिक साधनांचा जसे (लॉग बुक, हालचाली टोकन, मासेमारी वाहनांचे रंग कोडिंग, मच्छिमारांना त्यांच्या ओळखीसाठी बायोमेट्रिक कार्ड) याव्यतिरिक्त, अंतराळ तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानातील साधनांचा वापर (उदा. वेसेल मॉनिटरींग सिस्टम / ऑटोमेटिक आयडेंटिफिकेशन सिस्टीम) चा वापर करणे बंधनकारक असेल . एक प्रभावी एस.सी.एस यंत्रणा स्थापित करण्यासाठी केंद्र शासन , राज्य शासनासोबत काम

DRAFT

करेल. भारतीय तटरक्षक दल (आय .सी.जी) आणि तटीय पोलिसांना आवस्यक प्रशिक्षण आणि एम.सी.एस ला बळकट करण्यासाठी  सज्ज व्हायला हवे. समुदाय आधारित एस.जी.एस यंत्रणा स्थापित करण्यासाठी सर्व त-हेचे प्रयास केले जातील.

20.0 समुद्री मत्स्यव्यवसाय क्षेत्राचे डिझाईन,आकार, इंजिन , गिअर आणि संचलन क्षेत्राच्या आधारावर अनेक प्रकारच्या मत्स्य नौका , हे या क्षेत्राचे वैशिष्ट आहे. मत्स्य क्षेत्रासाठी आवश्यक जसे, ( नोंदणीकरण, प्रमाणीकरण , सर्वेक्षण,    नोंदणी , अनिवार्य कागदपत्रे आणि ट्रॅकिंग उपकरणे, उपरोक्त तरतुदींच्या उल्लंघन केल्यास दंड, मासेमारी वाहनांच्या सागरी सुरक्षा आणि मत्स्य वाहने चालविण्यासंबंधी आवश्यक मानकांची पूर्ती करण्यासाठी तसेच अन्न व कृषी संघटना (एफएओ), आंतरराष्ट्रीय सागरी संघटना (आयएमओ), आंतरराष्ट्रीय श्रम संघटना (आयएलओ) इत्यादी संबंधित एजन्सीजने ठरवलेल्या आंतरराष्ट्रीय मानकांचे आणि नियमांचे पालन करण्याकरिता संबंधित कायद्यांना अद्ययावत करण्याची आवश्यकता आहे.

21.0 पुढे, बोट बिल्डींग यार्डांची स्थापना आणि मासेमारी नौकांचे बांधकाम करणे , ही  देशामधील एक नियमन नसलेली बाब आहे. ज्यामुळे निकृष्ट दर्जाच्या वाहनांची निर्मिती केली जाते. त्यापरिणाम स्वरूप  स्थिरता, मासे पकडण्याची इष्टतम ठिकाणं, क्रूचे निवास आणि स्वयंपाकघरातील तरतुदी आणि शौचालयाची व्यवस्था अशा महत्वपूर्ण बाबींबाबत तडजोड करावी लागते. फायबर रेन्फोर्स्ड प्लॅस्टिक (एफआरपी) च्या अधिक वापरामुळे,  निकृष्ट गुणवत्तेच्या नौका बनविण्याची शक्यता वाढली आहे. शासन , सागरी राज्य /संघ राज्य  क्षेत्राच्या सागरी मत्स्य नियमन कायदा ( एम .एफ.आर .ए) च्या क्षेत्राच्या व्याप्तीच्या विस्ताराबाबत विचार करेल, ज्यामुळे बोट – बिल्डींग – यार्डाचे नोंदणीकरण , मस्त्य नौका समुद्रात चालविण्यास योग्य आहेत की नाहीत ,  त्यांचे वार्षिक सर्वेक्षण,  आयआरएस / तत्सम तांत्रिक संघटनेच्या माध्यमातून संचार आणि  सुरक्षा साधनांची नियमितपणे तपासणी आणि  मासेमारी वाहनांसाठी मानक डिझाइन इत्यादि बाबींचा त्यात अंतर्भाव असेल. तसेच नौका निर्मितीसाठी लागणारे  बांधकाम साहित्य आणि सतत

DRAFT

देखरेख ठेवण्याची प्रक्रियेचे नियंत्रण पूर्णतः केंद्र व राज्य शासनाच्या व्दारे केले जाईल.

22.0 भारत अनियमित आणि बेकायदेशीर (आय.यू.यू) मासेमारीला प्रतिबंध आणि नष्ट करण्यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय सामंजस्य/कराराचा  पक्षकार आहे. तसेच ह्याची खात्री केली जाईल की, भारतीय मत्स्य नौका/ आपल्या विशेष आर्थिक क्षेत्राच्या अखत्यारित आहेत का अन्य देशाच्या इइ.ई.झेड मध्ये. यकरिता शासन बंदर आणि समुद्रात सुसज्ज यंत्रणा स्थापित करेल.

23.0 अलिकडच्या काळात, आंतरराष्ट्रीय सागरी सीमा (आयएमबीएल) ओलांडणा-या भारतीय मच्छीमारांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. ही वाढ अनेक कारणांमुळे होत आहे. त्यातील एक कारण म्हणजे हेगच्या स्थायी लवाद न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या आधारावर आयएमबीएलचे पुनर्परिभाषित करण्याची गरज आहे. अशा प्रकारच्या घटना कमी करण्यासाठी, शासन मच्छिमारांना आवश्यक जागरूकता आणि प्रशिक्षण देईल. जेणेकरुन आयएमबीएलचे ओलांडणे टाळले जाईल.

24.0 आंतरराष्ट्रीय श्रम संघटना (आयएलओचा) करार 188 मासेमारी नौकामध्ये उत्तम परिस्थितीसाठी आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भातील एक ऐतिहासिक स्वरूपाचा आंतरराष्ट्रीय करार आहे. मच्छिमारी नौकांत काम करणारे खलाशी कामगारांना आवश्यक सुरक्षा उपलब्ध व्हाव्यात , ह्या हेतूने आपल्या राष्ट्रीय कायद्यामध्ये या करारातील कुठल्या तरतूदींचा समावेश करता येईल, या संदर्भात विचार करेल. या संदर्भात हेही आवश्यक असेल की, कोणत्याही एक राज्य /संघ राज्य क्षेत्रातील कामगार जेव्हा दुस-या राज्यात मत्स्य नौकांवर काम करण्यासाठी प्रवास करतात , तेव्हा ही त्यांना करारातील उपरोक्त तरतुदी लागू व्हाव्यात. आयएलओ कन्व्हेन्शन 188 च्या पुष्टीकरणासाठी आणि त्याच्या त्वरित कारवाईसाठी ठराविक कालावधीत लागू करण्यासाठी राज्य शासनासोबत मिळून कार्य करील. ज्यात नौका वाह्न कामगार आणि स्थलांतरित कामगारांच्या कामाच्या स्थितीत सुधारणा , आंतरराष्ट्रीय मानांकन आणि नियमांच्या बाबतीत मत्स्य

DRAFT

संबधित भारतीय कायदयांना अद्ययावत करणे तसेच वाहनांचे नोंदणीकरण आणि फिश लँडिंग सेंटर (एफएलसी), मासेमारी बंदर इ. साठी स्वच्छतेसंदर्भात ठराविक कालावधीत निकष तयार करणे सामील आहे.

25.0 आय.एल.ओ व्दारा असा अंदाज वर्तविला आहे की, समुद्रात मासेमारी करतांना जागतिक पातळीवरील दरवर्षी 24,000 मच्छीमार मरण पावतात. हे आकडे समुद्री दुर्घटनांबाबत चांगली आकडेवारी जपणा-या देशांमधून मिळविले आहे. यात जर इतर देशांतील मृत्यु दरांची नोंद घेतली गेली, तर हा अंदाज खूप जास्त असेल. भारतीय सागरी मासेमारीच्या प्रामुख्याने 'लघु-स्तरीय' मासेमारी करणा-या मच्छीमारांच्या दृष्टीकोनातून शासन हे निश्चित करेल की, समुद्रात - सुरक्षिततेच्या उपाययोजनाबाबत योग्य प्रकारे पूर्णतः प्रभावी अंमलबजावणी करण्यात आल्या आहेत. याबाबींसोबत जीवन संरक्षक उपकरणे जसे (आपत्ती सतर्कता ट्रांसमीटर (डी.ए.टी) , स्वयंचलित ओळख पध्दती(ए.आय.एस) आणि समान ट्रांसपोंडर, तसेच संचार उपकरण , मच्छिमार तसेच इतर संबधित भागधारकांना योग्य कौशल्य आणि क्षमता विकास करण्याचा अंतर्भाव आहे.

## मत्स्यिकी दस्तावेज आणि संशोधन

26.0 निर्णयांना मूर्त स्वरूप देण्याकरिता शासन विज्ञान-धोरणांच्या इंटफेसला सुदृढ बनवेल. सागरी मत्स्यिकी क्षेत्राच्या विविध पैलूंबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी वेळोवेळी विश्वनीय आणि वस्तुनिष्ठ दस्तावेजाची आवश्यकता भासेल. हे ध्यानात ठेवून , शासन केंद्र आणि राज्य शासन, संशोधन संस्था आणि भागधारकांना हाताशी घेवून एक त्वरित राष्ट्रीय सागरी मत्स्यव्यवसाय डेटा अधिग्रहण योजना लागू करेल . ज्याच्या सहाय्याने या संस्थांची मत्स्यव्यवसाय व्यवस्थापन यंत्रणेसाठी तसेच वेळोवेळी विश्वसनीय डेटा अधिग्रहणासाठी योग्य तंत्रज्ञानाव्दारे क्षमता बांधणी केली जाईल.

DRAFT

## सागरी मत्स्यपालन (मॅरीकल्चर )

27.0 सागरी मत्स्यपालन (मॅरीकल्चर ) जर शाश्वत स्वरूपात केल गेले, तर तटीय जलातून उत्पादन वाढीत महत्वाची भूमिका बजावू शकेल. या क्षेत्राच्या विकासासाठी शासन सागरी मत्स्य शेती/ पार्कच्या स्थापनेसाठी तसेच मत्स्यबीज पुरविण्यासाठी हॅचरी स्थापण्यासाठी प्रोत्साहन देईल. या उर्जिताप्राप्त क्षेत्रात संस्थात्मक आणि व्यावसायिक गरजा ज्यात लिज अधिकार , धोरण, स्थानीय योजना,तांत्रिक इनपुट ,हसबन्डरी, ,बीज, खाद्य, आरोग्याचे व्यवस्थापन ,पर्यावरणीय आणि सामाजिक प्रभाव, स्थानिक मच्छिमार आणि उद्योजकांची क्षमता बांधणी आणि स्थानिक बाजारांच्या मूल्य शृखंलांचा विकास सामील आहे. त्यावर उपाययोजना तटीय राज्य/ संघ राज्य क्षेत्राच्या तसेच संबधित भागधारकांशी विचारविनिमय करून केल्या जातील. लहान प्रमाणात मासेमारी करणारे मच्छीमार समुदाय, मच्छिमार गट, मत्स्य सहकारी संस्था किंवा शासकीय संस्थाच्या सहभागाला विशेष स्वरूपात प्रोत्साहन आणि पाठिंबा दिला जाईल.

## व्दिप(बेट)मासेमारी

28.0 अंदमान आणि निकोबार तसेच लक्षव्दीप समूहात टूना सारखी अधिक उत्पन्न देणा-या प्रजाती ,ग्रूपर्स, ,स्नेकर्स, इत्यादि कोरल मासे जसे व्यावसायिक मूल्य असलेल्या प्रजाती तसेच इतर म्हत्वपूर्ण प्रजाती मत्स्य संसाधनाच्या स्वरूपात अस्तित्वात आहेत. भौगोलिकदृष्ट्या हा भाग दूर असल्याने येथील मस्त्यविकासाला अडसर निर्माण होत आहे, तसेच मत्स्य संपत्तीचा इष्टतम (अधिकाधिक) वापर होवू शकत नाही. शासन मत्स्य संसाधनाचा शाश्वत वापर , मैरीकल्चर , स्थानिक मच्छिमारांच्या क्षमता बांधणीकरता समर्पित कार्यक्रम कार्यान्वित करील. आणि संस्थांना पोस्ट - हार्वेस्ट सहाय्य, उत्पादन घेतलेली

DRAFT

संसाधन मुख्य बाजारपेठेत आणि सागरी खादय निर्यातीपर्यंत पोहचविण्यास मंजूरी देण्यास चालना देईल.

पोस्ट - हार्वेस्ट आणि प्रक्रिया

29.0 देशात मासे उतरविण्याची केंद्रे , मत्स्य बंदरे आणि मासळी बाजाराची स्वच्छतेबाबत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. जेणेकरून त्यांना आंतरराष्ट्रीय मानकांच्याप्रमाणे बनविले जावू शकेल. भागधारकांना जागृत करण्यासाठी शासन कार्यक्रमांची सुरूवात करील , जेणेकरून ते मत्स्य बंदरांची स्वच्छता राखू शकतील. त्यचबरोबर राज्य शासन आणि बंदर विभाग प्राधिकरणाला, संबंधित बाबींच्या पूर्तीसाठी पूरक यंत्रणा विकसित करणे आणि बंदरावरील सोयी सुविधांचे दैनिक व्यवस्थापन इत्यादिसाठी, भागधारकांमार्फत चालविल्या जाणा-या व्यवस्थापकीय समितींसाठी प्रोत्साहित केले जाईल. अशा प्रकारे सुरक्षित आणि स्वच्छ सागरी खाद्याची(अन्नाची) पैदास होवू शकेल. पोस्ट - हार्वेस्ट मात्स्यिकी मध्ये भारताची क्षमता आणि प्रशिक्षणाची निकड लक्षात घेवून त्यांच्या गरजांची पूर्ती करण्यासाठी विशेष स्वरूपात प्रयास केले जातील.

30.0 आवश्यक पुरेशा पायाभूत सुविधा , सागरी मस्त्यिकी मूल्य -शृखंलेच्या बरोबर अनेक एम.सी.एस कार्यासाठी ही महत्वपूर्ण असते. आवश्यकतेच्या वस्तुनिष्ठ निर्धारणाच्या आधारावर तटीय परिसंस्थेवर होणारा न्यूनतम प्रभाव लक्षात घेवून , शासन अतिरिक्त सुविधांची निर्मिती करील, ज्यात बंदरावरती मत्स्य ड्रेसिंग केंद्र आणि मत्स्य प्रक्रिया केंद्राचा अंतर्भाव असेल. अशा प्रकारच्या पायाभूत सुविधांच्या स्थापनेमध्ये भागधारकांना थेट सहभागासाठी प्रोत्साहित केले जाईल. तसेच आवश्यकतांची पूर्ती जलद गतीने होण्यासाठी सार्वजनिक -खासगी- भागीदारी बरोबरच मस्त्य सहकारी संस्थानाही प्रोत्साहित केले जाईल.

DRAFT

31.0 सदयस्थितीत असा निष्कर्ष लावला गेला आहे , की मत्स्य हार्वेस्टचा जवळपास 15% भाग पोस्ट -हार्वेस्ट प्रक्रियेत वाया जात आहे. जी नैसर्गिक संपत्तीसाठी खूप मोठ्या नुकसानीची बाब  आहे. ज्याचा अधिक चांगल्या प्रकारे वापर केला जावू शकतो. शासन चांगल्या ऑन - बोर्ड मासे हॅंड्लिंगच्या माध्यमातून पोस्ट हार्वेस्ट नुकसानीची नोंद करेल, जेणेकरून अधिक मूल्य असलेले मासे आणि त्यांच्या उत्पादनातून त्यांची उत्तम गुणवत्ता आणि मूल्य मिळू शकेल. यामुळे मत्स्य संपत्तीची हानी कमी प्रमाणात होईल आणि मानवी उपभोगासाठी अधिक मासे उपलब्ध होतील. बाय -कॅचला कमी करण्याच्या दिशेने त्याची तीव्रता कमी करणारी पूरक साधने , गियर आणि इतर व्यवस्थापकीय उपायांना प्रोत्साहित केले जाईल.

32.0 मत्स्य खाद्य उद्योगात कमी प्रतीचे मूल्य असलेल्या प्रजाती हा चिंतेचा विषय बनल्या आहेत . यामुळे कमी प्रतीचे मूल्य असणा-या माशांची अतिमासेमारी आणि बाय कॅच मध्ये वृध्दी होवू शकेल. अशा प्रकारे सागरी परिसंस्थेलाही इजा पोहचेल. देशातील काही भागात मत्स्य खाद्य प्लांटच जाळ वाढलं आहे आणि छोट्या पेल्जीक  माशांची मागणी वाढल्याने अतिमासेमारी होत आहे. त्यांच्या परिणामस्वरूप देशातील काही भागात पैलजिक मत्स्य -स्टॉकमध्ये कमतरता जाणवत आहे. शासन मत्स्य खाद्य सयंत्रांच्या वाढत्या प्रसाराला नियंत्रित करीत तसेच त्या संदर्भात योग्य ती पावले उचलेल.

### व्यापार

33.0 भारतीय सागरी खाद्याचे जागतिक सागरी खाद्य व्यापारात महत्वपूर्ण स्थान आहे. मागील काळात भारतातून निर्यात होणा-या सागरी खाद्याच्या संख्यात्मक

DRAFT

आणि गुणात्मक दोन्ही स्वरूपात वृध्दी झाली आहे. इतक्या प्रमाणात विकास होवूनही , भारतीय सागरी खाद्याला स्वतःचे इष्टतम मूल्य प्राप्त करणे बाकी आहे. त्याचे प्रथम कारण म्हणजे कमी प्रतीचे मूल्यवर्धन आणि दुसरे उत्पादनाचे कमी प्रतीचे ब्रँडींगमुळे. या कमतरतेशी सामना करण्यासाठी उत्पादनांच्या वैविध्याला प्राधान्य दिले जाईल आणि मूल्यवर्धन, उत्पादनांच्या ब्रँडींगमध्ये सुधारणा आणि या उत्पादनांना जगभरातील विविध भागातील नवीन बाजारपेठेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. त्याच प्रकारे स्थानिक क्षेत्रातील मासे आणि मासे उत्पादनांची ग्राहकांच्या वाढत्या मागणीबरोबर हे निश्चित करण्यासाठी की, ग्राहकांना उत्तम प्रतीचे मासे मिळू शकतील, शासन सद्यस्थितीतील पायाभूत सुविधा , मूल्य साखळीचे आणि स्थानिक मत्स्य बाजारपेठांच्या अन्य महत्वपूर्ण गुणांचे पुनरवलोकन करेल.

34.0 मत्स्य उपादन ट्रेसेबिलिटी तसेच चेन ऑफ कस्टडीला संबोधित केले जाईल, कारण त्याचे सागरी खाद्य व्यापारात महत्वपूर्ण स्थान आहे. याव्यतिरिक्त सागरी खाद्य उत्पादनांना आंतरराष्ट्रीय मागणी आणि मानांकाप्रमाणे त्याचा दर्जा करण्याचा प्रयत्न केला जाईल. जेणेकरून मत्स्य उत्पादनांना अधिकतम मूल्य मिळू शकेल. याचबरोबर् स्थानिक बाजारपेठीय मूल्य शृखंलेत सुधारणा करण्यासाठी मत्स्य उत्पादनांना भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण ( एफ .एस. एस.ए. आई) च्या मानकांसोबत एकात्मिक केले जाईल. या संदर्भात शासन एफ .एस. एस. ए. आई बेंच मार्कला निर्यात तपास परिषद (ई.आई.सी) सोबत सामंजस्य प्रस्थापित करण्याबाबत विचार करेल.

35.0 सागरी खाद्याची ट्रेसेबिलीटी (शोधन प्रक्रिया)तसेच इको लेबलिंग मत्स्यव्यवसायाला पर्यावरणीय शाश्वततेची निश्चिती करण्याकरिता हळू हळू बाजार-आधारित हस्तक्षेप करण्याच्या स्वरूपात महत्व प्राप्त करीत आहे. युरोपियन संघा

(ई यू) च्या बाजारात निर्यात केल्या जाणा-या सर्व सागरी खादय पदार्थांसाठी त्या सागरी खाद्यपदार्थांची ट्रेसेबिलिटीची प्रात्यक्षिक दाखविणे , ही महत्वाची आवश्यकता आहे. येत्या काळात अधिक आयात करणा-या देशात आणि बाजारात फक्त प्रमाणित आणि लेबलयुक्त सागरी खादयपदार्थांची माग़णी केली जाण्याची संभावना आहे. शासन प्रमुख भारतीय मत्स्यव्यसायाच्या पर्यावरण लेबलिंगला प्रोत्साहित करण्यासाठी एक सशक्त वातावरण निर्मिती करील, जे मत्स्य साठा, सागरी खाद्य उद्योग आणि मच्छिमारांना लाभदायी असेल.

36.0 मासळी उतरविण्याची केंद्रे आणि किरक़ोळ बाजारातील मासे विक्रीच्या किंमतीमध्ये असलेल व्यापक अंतर हेच दर्शवते की, दलाल किंमतीतील अधिकतम हिस्सा घेतात. इथे क्रेडीट बंधनाच्या संदर्भातील मुद्दे ही असतात. या संदर्भात शासन आवश्यक परिस्थितीत हस्तक्षेप करील, ज्यामुळे मच्छिमारांचे दलाल आणि खाजगी अर्थसहाय्य देणा-याबद्दल असलेले परावलंबित्व कमी होईल. मच्छिमारांव्दारे आणि राज्यशासनप्रणित बंदर आधारित सहकारी संस्थांच्या माध्यमातून विपणन अधिक सुदृढ करण्याचे प्रयास केले जातील.

DRAFT

## सागरी पर्यावरण आणि प्रदूषण

37.0 भारत सागरी पर्यावरण प्रदूषणामुळे चिंतेत आहे. किंबहुना मासे मिळण्याचे प्रमाण घटण्याचे ही ते कारण आहे. या व्यतिरिक्त , प्रक्रिया न केलेले सांडपाणी, रासायनिक प्रदूषण, तसेच समुद्रातील प्लॅस्टिक तसेच घोस्ट फिशिंग सारख्या बाबी मत्स्य साठा कमी करीत आहेत. शासन प्रदूषण नियंत्रण नियंत्रित करण्यासाठी नियामन यंत्रणा मजबूत करील आणि याची निश्चिती करेल, की जमीन आणि सागराधारित प्रदूषण प्रभावीपणे नियंत्रण होवू शकेल तसेच परिसंस्थेवरही देखरेख राहील. मच्छिमारांनीही मासेमारी नौकांच्या माध्यमातून कुठल्याही प्रकारचे प्रदूषण

होणार नाही त्यासाठी त्यांच्या नौकांच्या डिझाईन आणि बांधणीत विशेष लक्ष पुरविले जाईल.

३८.० बंदराचा विकास बरेचदा तटीय भागात धूप आणि गाळ साचण्यास कारणीभूत झाला आहे. अशा प्रकारच्या विकासाने तटीय भागातील समीकरणच बदलली आहेत. त्याचा प्रभाव , परिसंस्थीय आणि मत्स्यव्यवसायावर पडत आहे. शासन सागरतटाची पायाभूत विकासाचा विचार करिता या पैलूंच्या निवारणार्थ  उचित प्रभावी यंत्रणा स्थापित करण्याचा विचार करेल.

३९.० ही बाब सर्वपरिचित आहे की, तटीय आणि तटाच्या बाजूला टेल -एन्ड सारखे परिसंस्थीय यंत्रणा असते आणि त्यात सापडणारी सागरी मत्स्य संसाधन गोड्या पाणी आणि तळाशी जमणा-या गाळाशी जमणा-या पोषक तत्वांवर अत्यंतिक अवलंबून असतात. मुळात हे जल मानववंशीय दबावाच्या आधीन असतात.(मानवनिर्मित प्रदूषण) त्याच्या परिणामस्वरूप पर्यावरणाच्या गुणवत्तेत घसरण आणि ताज्या पाण्याच्या प्रवाहाची कमतरता जाणविते. जी अनेक महत्वपूर्ण सागरी मत्स्य संसाधनाच्या साठ्यावर गंभीर परिणाम करीत आहे. विशेषत: उच्च मूल्य असलेले झिंगे, जे या अंतर्देशीय तटीय जलात आपले जीवन चक्राचा एक टप्पा पूर्ण करीत असतात. त्यामुळेच अशाप्रकारचे टेल - एन्ड परिसंस्थीय पर्यावरणीय एकात्मिकतेचे संरक्षण करण्याकरिता शासन लँडस्केप ते सागरस्केप दृष्टीकोनावर विचार करेल. ज्यात अंतर्देशीय जल संसाधनांचा योग्य व्यवस्थापन तटीय आरोग्य आणि सागरी परिसंस्थीय हिताची निश्चिती करेल.

४०.० शाश्वत मत्स्यविकासाचे संवर्धन करतांना सागरी पर्यावरण सागरी परिसंस्थीय एकात्मिकतेला बळकटी देण्यासाठी शासन भर देईल. जेणेकरून क्षतिग्रस्त तसेच संरक्षित प्रजातींवर भयानक परिणाम होणार नाही. खारफुटी-कांदळवन ,समुद्री -

DRAFT

गवत, प्रवाळी खडक हे सागरी परिसंस्थीय यंत्रणेचा अभिन्न भाग आहे. तसेच अनेक प्रजातींचे आणि सागरी सस्तन प्राण्यांचे  (समुद्री गाय) वसतीस्थान आहे. अशा परिसंस्थीय यंत्रणेचे मानवंशीय परिणामांपासून संरक्षण केले जाईल.

## वातावरणातील बदल ( अनुकूलन आणि पुढाकार)

41.0 वातावरणातील बदल सर्वाधिक मोठ्या आव्हानांपैकी एक आहे. ज्याचा मत्स्य क्षेत्र सामना करीत आहे. त्यासाठी कालबध्द अनुकूलन आणि व्यवस्थापकीय योजनेची आवश्यकता आहे. सागरी वातावरणातील बदलाचा प्रभाव भारतीय विशेष आर्थिक क्षेत्र आणि चहूओर पसरलेल्या खुल्या सामुद्रात मोठ्या प्रमाणातपाहायला मिळत आहे. काही प्रजातींच्या बाबतीत स्पष्ट स्वरूपात बदल झाले आहेत आणि मच्छिमारांना मासेमारीच्या दिशा बदलण्यास मजबूर केले आहे. काही ठिकाणी वातावरणातील बदलामुळे काही प्रजातींच्या मत्स्यसाठ्यात वाढ झालेली ही आढळते. शासन कालबध्द त-हेने अनुकूलन पर्याय लागू करण्या व्यतिरिक्त वातावरणातील बदलामुळे झालेला मत्स्य साठा आणि मच्छिमार समुदायावर झालेल्या परिणामांच्या केंद्रीत अभ्यासाला प्रोत्साहित करेल. वातावरणातील बदलाच्या आंतरराष्ट्रीय प्रतिबध्दतेचा भाग असल्याने मत्स्यव्यवसाय आणि मस्त्यसंबंधी घडामोडीत उत्सर्जित ग्रीन हाऊस गॅसेसना ( जी एच जी) कमी करून हरित मत्स्यव्यवसायाच्या विचाराला पुष्टी दिली जाईल.

## मच्छीमार कल्याण सामाजिक सुरक्षा नेटसाआणि संस्थातंर्गत केडिट्स

42.2 शासन सद्य स्थितीतील कल्याणकारी उपायांना चालू ठेवण्यासोबत प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण योजना( डीबीटीएस) च्या माध्यमातून देशाच्या मच्छिमार अमुदायाला सुरक्षा कवच प्रदान करणे आणि त्याला बळकटी देण्याचा विचार करेल. अशा प्रकारच्या उपायात मच्छीमारांना समुदाय कल्याण, आवास आणि इतर सुविधांचाही अंतर्भाव असेल.

DRAFT

43.0 चक्रीवादळ, लाटा अशा अशा उग्र नैसर्गिक प्रकोपाला नैसर्गिक आपत्ती मानली जाईल. अशाच स्वरूपात मानव निर्मित आपत्ती जसे की, समुद्रात ऑईल गळतीच्या घटनांनाही आपत्ती म्हणून मानली जाईल. तसेच याचा परिणाम झालेल्या मच्छिमार समुदायाला त्यांचे जीवनमान पूर्वपदावर आणण्याकरिता व्यावहारिक मदत केली जाईल. समुद्रात मुत्यु होणा-या मच्छिमारांना मिळणा-या मोबदला प्रक्रिया सुकुर केली जाईल , जेणेकरून मच्छिमारांच्या कुटुंबियांना योग्य वेळी त्याच्या लाभ मिळू शकेल.

44.0 मासेमारी बंदीमुळे होणा-या मत्स्य साठ्याच्या सकारात्मक प्रभावासाठी भागधारकांच्या एका मोठ्या वर्गाने आवाज उठविला आहे. काही सागरटटीय राज्ये आणि भागधारकांनी सद्यस्थितीत असलेला 61 दिवसांचा मासेमारी बंदीच्या कालावधीत वाढ करण्यासाठी जोर धरला आहे. बंदीकाळातील फायदे आणि भागधारकांचा चांगला प्रतिसाद लक्षात घेता, शासन मच्छिमारांसाठी मासे बंदीच्या काळात सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या मोबदला पॅकेजला अधिक बळकट करेल. हे फक्त भागधारकांचा संवर्धनातील सहभाग वाढवत नसून मस्त्य साठ्यात -हास होण्याची  जी लक्षण दिसत आहे, त्याला पुनर्निर्मिती आणि पुनरूत्थान करण्यासाठी ही मदत करेल.

45.0 मच्छिमार सहकारी संस्थांना कित्येक वर्षापासून गती मिळाली आहे आणि काही राज्य/ संघशासित प्रदेशामध्ये, अशा प्रकारच्या सहकारी संस्थांनी यशस्वी प्रदर्शनही केले आहे. मत्स्य क्षेत्रामध्ये सहकारी संस्था अधिक चांगल्या प्रकारे समुदायास सहाय्य करू शकतात. जर त्यांनी उत्तम व्यावसायिक प्रारूप (मॉडेल) स्वीकारले, ज्यामध्ये हार्वेस्ट आणि पोस्ट हार्वेस्ट दोन्ही कार्याचा समावेश असेल. देशात मत्स्य सहकारी संस्थाना जिथे आवश्यकता भासेल; तिथे शासन कौशल्य विकास,  तांत्रिक आणि आर्थिक सहाय्य करून अधिक प्रोत्साहित करेल तसेच

DRAFT

वातावरणातील बदलासंदर्भातील मुद्यांच्या निवारणार्थ वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारण्यासाठी त्यांना प्रोत्साहित आणि सक्षम केले जाईल.

46.0 मच्छिमारांना मासेमारी साधन आणि नौकांच्या खरेदीसाठी संस्थातंर्गत कर्ज प्राप्त होण्यास बरेचदा खूप कठीण होते, आणि परतफेडीच्या जोखीमीमुळे बरेच खाजगी अर्थसहाय्य (कर्जदार) आणि दलालांच्या कर्जाच्या जाळ्यात अडकले जातत. या स्थितीच्या निवारणार्थ शासन मच्छिमारांना उदार नियम आणि अटीव्दारे अर्थसहाय्य उपलब्ध करण्याबाबत विचार करील. या संदर्भात नाबार्डची भूमिका महत्वपूर्ण आहे, जी मच्छिमारांच्या गरजांचा विचार करेल.

47.0 शासन मासे पकडण्याच्या अधिक आर्थिक अणि कौशल्यपूर्ण पध्दतीने मासेमारी करण्यात पुढे जाण्याकरिता पारंपारिक मच्छिमारांना प्रशिक्षण, क्षमता बाधणी आणि तांत्रिक कौशल्याच्या वृध्दीकरिता पावल उचलेल.

## लिंग समानता

48.0

महिलांचे मत्स्य क्षेत्रातील पोस्ट-हार्वेस्ट प्रक्रियेत जवळपास 66 टक्के पेक्षा अधिक योगदान आहे. कुटुंब चालविण्याव्यतिरीक्त महिला मासे विक्री, मासे सुकविणे आणि इतर मूल्यवर्धित प्रक्रियेत महिला स्वयंसहाय्य गटामार्फत महत्वाची भूमिका निभावत आहेत. शासन महिलांव्दारा निभावल्या जाणा-या भूमिकेत आपल्या योगदानाला कायम ठेवील आणि महिलांना सहकारात भागीदार बनवून, महिलांना पूरक आर्थिक सहाय्य योजना राबवून महिलांच्या त्यांच्या कामाच्या ठिकाणी उत्तम सुरक्षा, साफ सफाई, किरकोळ विक्रिकरीता वाहतुकीच्या सुविधांचा अंतर्भाव आहे.

DRAFT

त्याचबरोबर लहान प्रमाणात मासेमारी, मूल्यवर्धित प्रक्रिया, आणि मासेमारी व्यवस्थापनात त्यांच्या सक्रीय सहभागाकरिता प्रोत्साहित करील.

## अतिरिक्त आणि पर्यायी उपजिविका

49.0

सागरी मत्स्य संसाधनात होणारी घट लक्षात घेवून, व्यापक प्रमाणात पसरलेल्या सागरतटीय मच्छिमार समुदयासाठी उपजिविकेकरिता अतिरीक्त आणि पर्यायी स्त्रोत आवश्यक असतील. सागरी मत्स्य पालन (मेरी कल्चर) आणि निसर्ग पर्यटन (इको-टूरिज्म) या संदर्भात महत्वपूर्ण मानले जातात. ह्या दोन्हीत उपजिविकेचे अतिरीक्त आणि पर्यायी स्त्रोत उपलब्ध करण्याची क्षमता आहे. इको- टूरिझमच्या स्वरूपात गेमफिंशिग (मासेमारी पकडण्याची प्रात्यक्षिक , सागरी खेळ) ,फोटोग्राफ आणि रिलीज (**CPR**) जगभरात लोकप्रियता मिळवित आहे. अंदमान आणि लक्ष्यव्दिप समूह, मुख्य भुमीच्या काही तट्यांच्याव्यतिरिक्त , अशा उपक्रमांना प्रोत्साह्न देण्यासाठी आदर्श स्थळ आहे. शासन उपयुक्त क्षेत्रामध्ये माच्छिमारांमध्ये सी.पी.आर योजनांना प्रोत्साहन देईल आणि सागरी जलक्षेत्राशी संबंधित पर्यटन योजनांच्या सामंजस्याबाबत विचार करील.

DRAFT

## नील वृध्दी पुढाकार

50.0 मत्स्यक्षेत्राच्या कार्यप्रणालीची पुर्नव्याख्या करतांना शासन मच्छीमार आणि त्यांच्या कुटुंबियांच्या जीवनमानात सुधारणाकरिता देशातील सागरी आणि इतर जलीय संसाधनांमार्फत मत्स्य संपत्तीच्या शाश्वत वापराव्दारा ‘निलक्रांती’ योजनेवर भर देईल. ‘निलक्रांती’ मध्ये नील वृध्दी पुढाकाराची तत्व अंतर्भूत असतील. जसे

की, शाश्वत विकास उद्दीष्ट्ये ( एस.डी.जी). या अंतर्गत लक्ष्य ठरविली गेली आहेत आणि त्याकरिता भारत देश कटिबध्द आहे.

51.0 सागरी जागांबाबत वाढती मागणी लक्षात घेता, सागरी स्थानीय योजना (एस.एस.पी) ची आवश्यकता महत्वपूर्ण आहे. समुद्रातील खनिज आणि तेल उपस्याच्या वाढत्या मागणीबरोबरच सागरी व्यापारी रहदारीची वाढती संख्या आणि संरक्षणाच्या हेतूमुळे कित्येक ठिकाणांवर असलेले आरक्षण यामुळे मासेमारी करण्यासाठी उपलब्ध जागा कमी पडू लागली आहे. या सद्यस्थितीतील विकासाला ध्यानात ठेवून , शासन एम. एस.पी साठी सर्व आर्थिक घडामोडींकरिता त्यांना जागा मिळेल आणि या प्रक्रियेत वादविवाद कमी होतील. याबाबत निश्चिती करेल.

## आंतराष्ट्रीय करार आणि व्यवस्था

52.2 भारतीय मासेमारी आता वैश्विक पातळीवर स्थिरावली आहे. मत्स्यव्यवसायाच्या वैश्विक अंजेडयाचे निर्देशन अनिवार्य आणि आणि अनिर्वाय नसलेल्या उपाययोजनांव्दारा केले जाते. जे मत्स्य व्यवसाय आणि पर्यावरण या दोन्ही पैलूंशी संबंधित आहे. अशा उपाययोजना आणि करारांवर एक स्वाक्षरीकर्ता होण्याच्या नाते भारताला या उपाययोजना आणि करारांना त्यांच्या आंतराष्ट्रीय उदिदष्ट्यांची पूर्ती करण्याकरिता कार्यान्वित करणे आणि मत्स्यवयवसायाला शाश्वत बनविण्याची आवश्यकता आहे. याचा परिणाम अतिरिक्त क्षेत्रांवर होईल आणि त्याचे पडसाद लाखो मच्छिमारांच्या उपजिविकेवर पडतील. शासन आंतरराष्ट्रीय करार / व्यवस्थांच्या उपायोजनांचे पालन करण्याची हमी देईल आणि अशा क्षेत्रीय आणि आंतरराष्ट्रीय घडामोडीत सक्रीय सहभाग देईल . भारताच्या नेतृत्वाखाली असे सागरी संसाधनांचे व्यवस्थापन हा मानवजातीच्या सामान्य वारस्याचा भाग आहे.

DRAFT

53.0 आज अन्न आणि कृषि संस्थेने (**FAO**) मत्स्यविषयक शाश्वत विकासाकरिता केलेली जबाबदारीयुक्त मासेमारीसाठीची आचारसंहिता ही जागतिक मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील अत्यंत महत्वपूर्ण बंधनकारक नसलेला करार आहे. याची व्याप्ती वैश्विक पातळीवरील एफ . ए. ओ चे सदस्य आणि बिगरसदस्य, मत्स्य संस्था, सर्वप्रकारच्या संघटना , मच्छिमार, मासे आणि मस्त्य प्रक्रिया तसेच विपणनात सामील असलेल्या संलग्न व्यक्ति ; अशी प्रत्येक व्यक्ति जी मासेमारी व्यवस्थापन आणि विकासासाशी संबंधित आहे , यांना मार्गदर्शक असेल. ही आचारसंहिता ऐच्छिक स्वरूपाची आहे आणि यातील बराचसा भाग संयुक्त राष्ट्रांच्या अनेक परिषदा आणि करारांमधून उचलला आहे, हे यापूर्वीच नमूद केले आहे. ही आचारसंहिता सर्व प्रकारचे मत्स्य संवर्धन , व्यवस्थापन आणि विकासासाठी लागू तत्व आणि मानकांना निर्धारित करते. यासंदर्भात शासन हे निश्चित करेल की, सागरी मत्स्य क्षेत्राशी संबंधित आचारसंहिता – मार्गदर्शक तत्वे यांच्या संपूर्ण कार्यवाहीत संमिलित व्हाव्यात.

54.0 जागतिक समुदायाला दारिद्र्य निर्मूलन आणि अन्न सुरक्षेबाबत लहान प्रमाणात मासेमारी करणा-या क्षेत्राचे भरीव योगदानाची जाणीव आहे आणि त्यांनी लघु प्रमाणात केल्या जाणा-या मासेमारीसाठी ऐच्छिक मार्गदर्शक तत्वांचा (आचारसंहितेचा) स्वीकार केला आहे. या लघु मासेमारी बाबतच्या ऐच्छिक मार्गदर्शक तत्वात 'अन्न सुरक्षा आणि दारिद्र्य निर्मूलनाबाबत , लहान प्रमाणात मासेमारी करणा-या समुदायाप्रती मानव अधिकार आधारित दृष्टी बाळगणे , हे महत्वाचे उद्दीष्ट्य आहे. शासन लघु प्रमाणात मासेमारी असणारी आणि त्यातील विशेष मासेमारीवर उपजिविकेसाठी अवलंबून असणा-या समुदायातील गटांतील गुंतागुंत लक्षात घेता, वी जी – एसएसएफ च्या तरतुदींचा अवलंब करण्याचा प्रयत्न करेल.

DRAFT

55.0 बंधनकारक आणि बंधनकारक नसलेल्या आंतरराष्ट्रीय उपायांमध्ये अंतर्भाव असलेल्या तरतुदी सामान्यतः एक – दुस-याच्या पूरक क्षमता प्राप्त करतात. त्यासाठी हे आवश्यक आहे की, या उपायांना स्वतंत्रपणे न पाहता, त्याचा सर्वसमावेशक स्वरूपात विचार करणे . शासन अशा उपायांना अधिक समजून घेण्यासाठी आणि त्यावर ठोस अंमलबाजावणी करण्यासाठी भागधारक आणि मच्छिमार संस्थांसोबत व्यापक चर्चेला प्रोत्साहन देईल.

### क्षेत्रीय सहयोग

56.0 भारतीय उपमहाद्वीप पश्चिमेकडे अरबी समुद्र आणि पूर्वेस बंगालच्या खाडीने वेढलेला आहे. हे दोन समुद्र एकत्रितपणे वरती हिंद महासागराचा भाग बनतात. पश्चिम किनारपट्टीवर भारताने पाकिस्तान आणि मालदीवसह समुद्री सीमा व्यापल्या आहेत, तर पूर्व किनारपट्टीवर श्रीलंका, बांगलादेश, म्यानमार, थायलंड आणि इंडोनेशियासह सामायिक सीमा केल्या आहेत. काही बाबतीत, त्या केवळ सागरी समुद्री सीमाच नव्हे तर त्या परिसंस्थीय अंगानेही जोडल्या गेल्या आहेत. जसे भारत आणि श्रीलंका यांच्यातील मन्नारची खाडी आणि पाल्क बे, बांग्लादेश आणि भारत यांच्यातील सुंदरबन , अंदमान समुद्रातील माईइक (मेर्गू) द्वीपसमूह. अरब सागर आणि बंगालची खाडी दोन्ही ठिकाणी स्थलांतरित झालेले टुना आणि टूनासारख्या प्रजाती तसेच काही ठिकाणी शार्क आणि स्पॅनिश मैकेरल्ससारख्या माशांची वसतीस्थाने आहेत. शासन परिस्थितीनुसार आवश्यकतेनुसार, सागरी संसाधनांच्या शाश्वत वापर, मत्स्यसाठ्यांचे संरक्षण आणि व्यवस्थापनासाठी प्रभावी क्षेत्रीय सहकार्याला बळकटी देण्यावर भर देईल.

DRAFT

57.0 मच्छिमार समुदायाच्या सुरक्षा आणि संरक्षणासाठी अंतर्गत सहकार्य ही अपेक्षित आहे, काही ठिकाणी असे पाहिले गेले आहे की, जसे हिंद महासागरातील वरचा भाग विशेषत: बंगालची खाडीत दरवर्षी अत्यंत प्रतिकूल हवामानामुळे मच्छिमार त्यांचे प्राण गमावतात किंवा अत्यंत खडतर परिस्थितींचा सामना करीत आहेत . याशिवाय व्दिपक्षीय व्यवस्थेच्या मार्फत सागरी मत्स्यक्षेत्रातील सहयोगाबरोबरच क्षेत्रीय मत्स्य क्षेत्र आणि पर्यावरणीय विभागातील सहकार्याला प्राधान्य दिले जाईल. अशा सहकार्याने सामायिक संसाधने आणि सामायिक परिसंस्थीय सामंजस्यपूर्ण धोरण आणि ट्रांस –सीमा संसाधनाचा इष्टतम (कमाल) वापरासाठी पूरक कार्यक्रम , मानवाधिकाराचे रक्षण, विशेष म्हणजे अन्य देशात समुदातून दुस-या सीमांमध्ये जाणा-या मच्छीमारांच्या हितांचे रक्षण केले जाईल.

58.0 भारतीय मच्छिमारांची आव्हानात्मक परिस्थितीत काम करण्याची क्षमता, कष्टाळू स्वभाव आणि दक्षता यांना इतर देशात व्यापक स्वरूपात मान्यता प्राप्त झाली आहे. या परिणाम स्वरूप , भारतातून जास्तीत जास्त मच्छिमार आता इतर देशांच्या मासेमारी जहाजांवर रोजगार शोधत आहेत. बरेचदा भारतीय मच्छिमारांना इतर देशातील विशेष आर्थिक क्षेत्रात मासेमारी करतांना शेजारी देशांकडून पकडले जाते. शासनाला अशा मच्छिमारांच्या संरक्षणासाठी सामान्य मार्गाने सुटका करणे अवघड होवून जाते. शासन इतर देशांमध्ये मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील नोकरीसाठी इच्छुक असलेल्या मच्छिमारांमध्ये पुरेसे कौशल्य आणि इतर समुद्रांचे ज्ञान असायला हवे आणि ते आय.एल.ओ परदेशी समुद्रात काम करणे आणि शासनाची औपचारिक मंजुरी मिळवून देणे आवश्यक आहे , याबाबत खात्री करेल.

## शासन आणि संस्थांर्गत पैलू

59. समुद्री मत्स्यव्यवसाय क्षेत्र तटीय राज्य / संघ राज्य क्षेत्रातील शासन ( मत्स्य विभाग) केंद्र शासन (पशुपालन, दुग्ध आणि मत्स्यपालन विभाग, वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय , तट रक्षक) आणि वैज्ञानिक संस्थामार्फत हाताळले जाते. या

DRAFT

विविधतापूर्ण शासन संरचनेत एकीकडे कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय आणि आणि तटीय राज्ये / संघ शासित प्रदेश तसेच दूसरी कडे केंद्र शासनाची विविध मंत्रालय / विभागाच्या मध्ये प्रभावी समन्वय आवश्यक आहे. याशिवाय, तटीय राज्ये / संघराज्यक्षेत्रामध्ये समान सहकार्य देखील आवश्यक आहे; जेणेकरुन मत्स्यव्यवसायाचा शाश्वत स्वरूपात वापर होईल. या संदर्भात शासन सर्व संबंधित एजन्सीजमध्ये दृढ समन्वय प्रस्थापित करण्यासाठी यंत्रणा विकसित करेल.

60.0 भारतीत सागरी मासेमारी पध्दती आणि संसाधनाच्या वापरामध्ये बहुआयामी आणि गतिशील आहे. सागरी मासेमारी नियमन कायदा (एम.एफ.आर.ए) 1980 पासून अस्तित्वात आला . तरी काही राज्य / संघराज्यातील क्षेत्रांना सोडून, एम.एफ.आर.ए मध्ये 1990 च्या दशकाच्या मध्यात लागू झाला. या बाबींना लक्षात घेवून की, बहुतांश एम.एफ.आर.ए महत्वपूर्ण आंतरराष्ट्रीय करार / सामजंस्य ( जसे 1982 यू.एन.सी.एल.ओ.एस, 1992 यू.एन.एफ.एस.ए, 1995 एफ.ए.ओ सीसीआरएफ) स्वीकारण्यापूर्वीच स्वीकारल्या होत्या. शासन अस्तित्वात असलेल्या एमएफआरए मध्ये मत्स्यव्यवस्थेसाठी कायदे आणि सुव्यवस्थेला अद्ययावत शासित करण्यासाठी विद्यमान नियम व नियमावली अद्ययावत करण्याबाबत विचार करेल आणि त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय उपाययोजना / व्यवस्थांसोबत ह्याची निश्चिती करील , की त्यात मत्स्यव्यवसाय व्यवस्थापनातील सर्व पैलूंचा समावेश असेल. या राज्य/संघराज्य क्षेत्रांच्या परिप्रेक्ष्यात एक मॉडेल बिल (प्रारूप विधेयक) तयार करून केले जाईल.

61.0 केंद्र शासन विशेष आर्थिक क्षेत्रात म्हणजेच 12 ते 200 नॉटिकल मैलात मासेमारी वर नियंत्रण आणि नियमनासाठी कटिबध्द आहे. ई.ई.झेड मध्ये सुयोग्य कायद्याबरोबरच मासेमारी नियमनाची आवश्यकता आहे. शासन या क्षेत्रात मत्स्यक्षेत्रातील शाश्वत विकास आणि मत्स्यव्यवसायाच्या व्यवस्थापनासाठी अशा प्रकारचे कायदे लागू करण्याचा प्रयत्न करेल.

DRAFT

## भावी मार्गक्रमणा/दिशा

62.0 एनपीएमएफ, 2017 च्या व्दारा पुढील दशकभरात  सागरी मत्स्यव्यवसाय क्षेत्राच्या बहु-आयामी आणि वाढत्या गरजा पूर्ण करेल अशी अपेक्षा आहे. हे धोरण सर्वसमावेशक आहे आणि या विविध स्थरांवरील आर्थिक क्रियाकलापांच्या सर्व विभागांच्या गरजा समग्रपणे अधोरेखित करते. एनपीएमएफ, 2017 मध्ये एक 'अंमलबजावणी योजना' असेल जी धोरणामध्ये समाविष्ट असलेल्या प्रत्येक शिफारसी अंतर्गत 'कार्य बिंदू' निर्दिष्ट करेल. या कार्य बिंदूंची अंमलबजावणी करण्यासाठी काल मर्यादा , कामासाठी जबाबदार एजन्सी आणि अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या निधीच्या संभाव्य स्रोतांसह अधिक कार्य आणि विस्तार केला जाईल. 'अंमलबजावणी योजने' मध्ये 'देखरेख आणि मूल्यांकन' विभाग देखील असेल;  जो अंमलबजावणीची कालबध्दता आणि कार्यक्षमतेला संबोधित करेल. अशी अपेक्षा आहे,  की या धोरणाच्या अंमलबजावणीद्वारे, भारतातील सागरी मत्स्यव्यवसाय क्षेत्र एक शाश्वत आणि सुव्यवस्थापित संस्था म्हणून उदयास येईल. मानवी उपभोगासाठी उत्पादनांचा समुचित उपयोग वाढेल;  रोजगार, लिंग समानता; अन्न सुरक्षा आणि पौष्टिकता यांसारख्या तरतूदींमुळे या क्षेत्रात धन आणि समृध्दीची निर्मिती होईल.

आदित्य कुमार जोशी, सह. सचिव

DRAFT

DRAFT